# पुस्तक प्रकाशन आणि प्रकाशक

संशोधक
प्रमोद वा. तडस
ग्रंथालय आ ण माहितीशास्त्र वभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर
वद्यापीठ, नागपूर
pramod.tadaso9@gmail.com

मार्गदर्शक
प्रा. डॉ. सुनिल ह. उरकुडकर
ग्रंथपाल
आर्टस ॲन्ड सायन्स कॉलेज, पुलगांव,वर्धा
sunil1urkudkar@gmail.com

---

**सार: *(Abstract)***

*पुस्तक प्रक्रिया ही एक दिर्घ व काहींशी गुंतागुतीची प्रक्रिया आहे. असे संशोधकाला वाटत असल्यामुळे पुस्तक प्रक्रिया आणि प्रकाशक यावर एक छोटासा लेख लिहिण्याचा प्रयत्न आहे. कारण पुस्त्क प्रकाशनामध्ये पुस्तक निर्मितीची प्रक्रिया ही एक सांघीक प्रक्रिया आहे. यामध्ये प्रकाशक, लेखक, संपादक, मुद्रीतशोधक, डिझायनर, मुखपृष्ठकार, चित्रकार, बांधणीकार, मार्केटिंग व्यवस्थापक हे सगळे मिळुन एक संघ होऊन कार्य करीत असतात. त्यामुळे पुस्तक प्रकाशक प्रक्रियेमध्ये वरील सर्व घटक अत्यंत महत्वपूर्ण आहे. परंतु या पलीकडे जाऊन ह्या सगळ्या घटकांना एक सांघीक रुपात एकमेकांशी बांधुन ठेवणारी उत्तम यंत्रणा तयार करणे हे सर्व प्रकाशन संस्थेच्या हातात आहे. पुस्तक निर्मीती प्रक्रियेमध्ये प्रकाशकांचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. कारण सगळ्यांचे, कौशल्य, कामाप्रतिची निष्ठा, सहकार्य, परस्पर-समन्वय यावर प्रकाशन संस्थेचे यश व उत्कर्ष अवलंबुन आहे. म्हणुन पुस्तक प्रकाशन प्रक्रियेमध्ये प्रकाशकांना अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.*

**बीजसंज्ञा (Keywords)**

पुस्तक प्रकाशन, प्रकाशक, लेखक, संपादक, मुद्रितशोधक, डिझायनर, मुखपृष्ठकार, चित्रकार, बांधणीकार, विक्रेते, प्रक्रिया.

---

**प्रस्तावना (Introduction) :**

प्रकाशन व्यवसाय हा इतर व्यवसायापेक्षा वेगळा व्यवसाय आहे. कारण प्रकाशन व्यवसाय हा बौध्दीक पातळीवर आव्हान व अनेक अवधाने सांभाळुन करावा लागणारा व्यवसाय आहे. प्रकाशक माहिती व ज्ञानाची ओळख करुन घेतल्यानंतर माहिती व ज्ञान गोळा करतात. त्या माहितीची व ज्ञानाची समाज ामध्ये किती प्रकर्षाने गरज आहे. याचा सर्व प्रथम अंदाज घेतात. कलात्म व सुंदर आकार देऊन तार्कीक सुसंगत असलेले आपले प्रकाशन समाजाला बहाल करतात. कारण पुस्त्क प्रकाशीत झाल्यानंतर त्यांची समाजामध्ये समीक्षा होते. हे पुस्तकरुपी अपत्य जन्माला घालतांना प्रकाशक एका मातेप्रमाणे वेदनाच सहन करीत असते. परंतु जेव्हा पुस्तकाची निर्मिती होते तेव्हा एक सुखद अनुभुती देखील येते. स्वत:बद्दल आणि आपल्या वेदनाबद्दल प्रकाशक फारसे बोलत नाही. त्यामुळे प्रकाशन व्यवसायासंबंधी मुद्रणकला व प्रकाशन व्यवसाय. मुद्रणकला ही पुरातन कला आहे. इ.स. 175 मध्ये चीनने या कलेची सुरुवात केली 10 व्या शतकापर्यंत मुद्रणकला ही चीनमध्ये प्रख्यात झाली होती.

मुद्रणकलेचा विकास युरोपमध्ये 14 व्या शतकामध्ये झाला. भारतामध्ये ज्ञानेश्वरी हा ग्रंथ 1220 मध्ये लिहिला गेला. 15 व्या शतकाच्या मध्यावर जर्मनीमध्ये जोहान्स गुटेनबर्ग याने आधुनिक मुद्रणकलेचा प्रसार केल्याचे दिसुन येते. त्यानंतर गोवा येथे 1550 साली मुद्रणकलेचा भारतामध्ये प्रसार झाला. 1560 मध्ये भारतात पहिले पुस्तक छापले गेले. 1804 पासुन छपाई कलेमध्ये 'देवनागरी' लिपीचा वापर करण्यात आला. त्यातुनच पुस्तक प्रकाशनाला सुरुवात झाली असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही.

समर्थ रामदास स्वामी म्हणतात,

"जेणे परत्र साधना जेणे ग्रंथे होय ज्ञान।
जेणे होईजे पावन त्या नाव ग्रंथ।।"

पुस्तक लेखकाने लिहिण्यापासून ते त्याला पुस्तकरुपी लाभण्यापर्यंतची प्रक्रिया म्हणजे ग्रंथ निर्मिती प्रक्रिया होय.

**पुस्तक निर्मिती प्रक्रिया :**

ग्रंथ लेखक आणि वाचक यांना जोडणारा दुवा म्हणजे प्रकाशक होय. प्रकाशकांनी नेमलेल्या विक्रेत्याद्वारे छापील पुस्तक हे वाचकाला उपलब्ध करुन देण्याचे कार्य प्रकाशककरीत असतो. आजच्या आधुनिक युगामध्ये ऑनलाईन विक्री जास्त प्रमाणात मागणी असल्यामुळे ॲमेझॉन, फ्लिपकार्ट ही सुध्दा पुस्तके उपलब्ध करुन देणारे विक्रेतेच आहे. ग्रंथ निर्मितीमध्ये प्रकाशकांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

**प्रकाशक व लेखक संपर्क आणि व्यवहार :**

पुस्तक प्रकाशनामध्ये प्रकाशकांबरोबर लेखकसुध्दा प्रक्रियेमधला महत्वाचा घटक आहे. याबद्दल मनोविकास प्रकाशनसंस्थेचे मा.अरविंद पाटकर यांनी असे म्हटले की,कधी लेखक प्रकाशकांकडे येतात तर कधी प्रकाशक लेखकांचा शोध घेतात. प्रकाशक लेखकाला विशिष्ट विषय देऊन त्यांच्याकडुन लिहुन घेतात. वाचकांची वाचनाची अभिरुची कशाप्रकारे वाढविता येईल. हा दृष्टीकोन प्रकाशकांचा असतो. प्रतिभावंतांना चालना देणे, नवीन कल्पक प्रकल्प राबविणे, आणि जागतिक किर्ती प्राप्त करुन देणे हा हेतु प्रकाशकाचा असतो.

**पॉप्युलर प्रकाशनचे प्रकाशक रामदास भटकळ यांच्या मते :**

लेखकांशी उत्तम संवाद सहृदयी व्यवहार प्रस्थापीत करणे, प्रकाशनापुर्वीच लेखकांशी करार करणे, अंतरंगाला साजेशे मुखपृष्ठ तयार करणे, प्रतिभावान चित्रकाराकडुन काढुन घेणे. सुयोग्य मांडणी करुण यासारख्या नवीन प्रभावी व नाविण्ययुक्त प्रथा सुरु केल्या.

**राजहंस प्रकाशन चे प्रकाशन :**

मा.दिलीप माजगांवकर यांनी राजहंस मैफील◌ीत बोलतांना म्हटले की, "प्रकाशन संस्था ही लेखकांमुळेच मोठी होत असते. राजहंसच्या वाट्याला चांगले लेखक मिळाले. त्यामुळे राजहंस भाग्यशाली राहिले. राजहंस चे यश हे संघभावनेचे यश आहे. अशा शबदात त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या.

**प्रकाशक – लेखक करार :**

प्रकाशक आणि लेखक यांच्यामध्ये पुस्तकाचा विषय, आशय, प्रकार इ. चर्चा झाल्यानंतर पुस्तक छापण्याचे निश्चित होते. त्यानंतर व्यवसायाचा कायदेशीर भाग म्हणुन लेखकाचे मानधान देण्याची पध्दत, पुस्तकाचे स्वाभित्व हक्क, लेखकाला पुस्तकाच्या दयावयाच्या प्रति ह्यागोष्टी लिखीत स्वरुपात होण्याकरिता प्रकाशक व

लेखक यांच्यामध्ये लेखी करार केला जातो. हा पुस्तक प्रक्रियेतील दुसरा टप्पा होय.

डायमंड प्रकाशन चे प्रकाशक, मा. निलेश पाष्टे सर म्हणतात, की, आमच्या काळामध्ये प्रकाशकाकडे येणाऱ्या होशी, नविन लेखकांची संख्या वाढत आहे. याविषयी बोलतांना पाष्टे साहेब म्हणतात, "एखाद्या विषयाचा वाचक खूप कमी आहे तो विषय लिहिणारा लेखक फारसा नावाजलेला नाही. ज्या पुस्तक विक्रीचे चित्र सपष्ट नाही अशा वेळेस प्रकाशक लेखकाला नकार देतो. परंतु काही वेळा पुस्तकाच्या काही प्रति लेखकाने विकत घ्याव्या किंवा त्याप्रतिची रक्कम भरण्याकरिता सांगितले जाते. या थेट रक्कम भरण्याला व्हॅनिटी प्रेस अशी संज्ञा वापरण्यात येते. या व्यवहारामध्ये प्रकाशकाला धोका नसतो. तर तो लेखकाला असतो. आणि जर पहिल्या आवृत्तीला चांगला प्रतिसाद मिळाला तर दुसऱ्या आवृत्तीचे स्वरुप इतर पुस्तकाप्रमाणे ठरविले जाते."

**संपादकीय संस्कार :**

प्रकाशक हा कोणत्याही प्रकाशन संस्थेचा केंद्रबिंदु असतो. प्रकाशनाची संपुर्ण रचना प्रक्रियेमध्ये प्रकाशक हा अत्यंत महत्वाचा घटक असतो. या प्रक्रियेमध्ये मोलाचे सहकार्य जे मिळते ते संपादकाकडून मजकूर संपादन व त्यातील आशय, भाषा, मांडणी करुन घेणे, त्यासंबंधी त्यांच्या कल्पना घेणे. ही सगळी जबाबदारी संपादकांची असते आणि या कार्यालाच संपादकीय संस्कार असे म्हणतात.

**डीटीपी वर्क :**

संपादकीय सं◌ंस्कार झाल्यानंतर मजकुर प्रतिचे पुस्तक रुपात रुपांतर करण्याच्या प्रक्रियेलाच डीटीपी किंवा लेआऊट डिझाईन सुध्दा म्हणतात. प्राप्त झालेल्या लिखीत मजकुराला डीटीपी करणारा टाईपराईटर संगणकावर टाईप करतो. टायपिंग पुर्ण झाल्यानंतर त्याचे कागदावर प्रिंट काढल्या जाते. प्रिंटआऊट व मुळ लेखन मुद्रित शोधकाकडे पाठविले जते.

**मुद्रितशोधक :**

मुद्रीतशोधक आपल्याकडे आलेल्या संगणकीय प्रतितील मजकुरात टाईप करतांना झालेल्या काना, मात्रा,विलांटी, पुर्णविराम, उदगारवाचक चिन्ह, या चुका दुरुस्त करुन शुध्दलेखन, वाक्य रचना तपासुन मुळावर हुकुम व व्याकरण तो मजकुर तपासुन दुरुस्त्या केलेले लेखन डीटीपीवाल्याकडे पाठवतो. नंतर डिटीपी करणारा चुका दुरुस्ती करुन प्रिंटआऊट काढुन पुन्हा परत मुद्रीत शोधकाकडे पाठवितो. मुद्रीतशोधक राहीलेल्या चुका पुन्हा पाठवित◌ो. संपुर्ण दुरुस्ती निर्दोष झालेला मजकुर पाठविल्या जाते.

**लेआऊट डिझाईनिंग :**

मुद्रीत शोधनानंतर डिझाईनिंग केल्या जाते. यामध्ये लेआऊट डिझाइनर आणि डिटीपी ऑपरेटर यांची महत्वाची भुमिका असते. संपुर्ण लेखन पुस्तकांच्या आकारामध्ये आणणे, हेडर चार्ट, चित्र पुस्तकामध्ये योग्य ठिकाणी ठेवणे हे डिझायनरचे काम असते.

**चित्रकार व मुखपृष्ठ :**

पुस्तकांच्या अंतर्भागात रेखाचित्र किंवा इतर चित्रांची गरज असते. म्हणुन पुस्तक प्रकाशनामध्ये चित्रकार पण महत्वाचा घटक आहे. प्रकाशक पुस्तकाचा विषय पाहुन चित्रकाराची निवड करतो, संपादक चित्रकारासोबत पुस्तकाविषयी चर्चा करुन चित्रकार ठरविल्या जाते. वाचकांचे लक्ष वेधून घेणारा पुस्तकाचा आकर्षण बिंदु म्हणजे मुखपृष्ठ होय.पुस्तकांचा विषय, आशय, बाज बघुन त्याचे मुखपृष्ठ ठरविल्या जाते. यामध्ये प्रकाशक, संपादक,

लेखक आणि चित्रकार या चौघांचे मत विचारात घेवून मुखपृष्ठ ठरविल्या जाते.

**छपाई :**

डिझाईन चित्रकार, मुखपृष्ठ हे पुस्तकाचे काम झाले की पुस्तक छपाईकरिता तयार होते. छपाईपुर्वी कागद निवडीचा विचार करावा लागतो. मा. पाष्टे सरांच्या मते, कथा कांदबऱ्यांच्या पुस्तक छपाईकरिता हलक्या पिळसर कागदाला प्राधान्य दिले जाते. वैचारीक पुस्तकांना पांढरा कागद वापराला जातो. हा कागद दिसायला जाड असतो. परंतु तो वजनाला हलका असतो. त्यामुळे पुस्तकांचे वजन कमी होते. आणि हा वाचकांना हाताळायला सोपे जाते. आता इंग्रजीकरिता वापरणाऱ्या कागदाचा उपयोग मराठी सुध्दा करण्यास सुरुवात झाली आहे.

**बांधणी :**

बाईडिंग विभागात पुर्वी हाताने घडया घातल्या जात होत्या. परंतु आता मशीन आल्यामुळे मशीनचा उपयोग केल्या जातो. कागदाचे पेंज नंबर प्रमाणे जुळविले जाते. त्यानंतर पुस्तकाला कव्हर पेज लावून मशीनवर ठेवल्या जाते. याला परफेक्ट बाईडिग असे म्हणतात. यानंतर बाईडींग होऊन नवीन कोरे पुस्तक प्रकाशकांच्या हातामध्ये येते.

**पुस्तकांची किंमत :**

पुस्तकाची छपाई करण्याअगोदर किंमत निश्चित केली जाते. पुस्तक किती चालेल याचा अंदाज बांधल्या जातो. मागणी बाजारपेठेचा अंदाज हे ह्या सगळ्या गोष्टी विचारात घेवून पुस्तकाची किंमत ठरविली जाते. कधी कधी किंमत कमी असेल तर पुस्तकांची विक्री जास्त प्रमाणात होते आणि किंमत जास्त असेल तर पुस्तकांची विक्री कमी होते. उदा. रोहन प्रकाशनाचे प्रकाशक रोहन चंपानेरकर 1रु. 25 पैसे यानुसार पुस्तक किंमत ठरविण्याचा ट्रेड असल्याचे सांगतात. 100 पानाचे पुस्तक असेल तर 125 रु. किंमत ठेवतो असे ते म्हणतात.

**वितरण व विक्री :**

पुस्तकाची किंमत ठरवुन पुस्तक तयार झाले की मग त्याचे वितरणाचे व्यवस्थापन प्रकाशक करतो. विपणन, मार्केटिंग आणि विक्रीबाबत विचार केल्या जाते. पुस्तकांचा विषय, लेखक, लिखाणाचा उद्देश या सगळ्यांचा विचार करु, विपनणांचे तंत्र आणि अंदाजपत्रक ठरविल्या जाते. पुस्तकाचे अंदाजपत्रक आणि प्रकाशन संस्था या नुसार वेगवेगळे असते.

**मार्केटींगचे दोन प्रकार आहे.**

1. **डायरेक्ट टु कंजुमर** – वर्तमानपत्रे, नियतकालीके, न्यूजपेपर यामधील जाहीरातीद्वारे विक्री करणे.
2. **विपणन साखळी -** पुस्तकांचे दुकान, पुस्तक, जत्रा व ग्रंथ प्रदर्शने, ऑनलाईन विक्री साइट इत्यादी मार्फत पुस्तक विक्री केली जाते.

डायमंड प्रकाशनचे प्रकशक आ. पाष्टे सरांच्या मते, "आज या युगामध्ये विक्री आणि मार्केटिंगचे स्वरुप बदलत चालले आहे. पुस्तक हे जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचण्याकरिता आणि वाचकांना पुस्तकांचा लाभ होण्याकरिता ऑनलाईन शॉपिंग वेबसाईटचा भरपूर वापर केला जातो. या करिता डायमंड प्रकाशनने ॲमेझान सोबत काही करार केलेले असुन अक्षरनामा हे आमचे स्वतंत्र पोर्टलही सुरु केले आहे."

**निष्कर्ष :**

प्रकाशकाला ग्रंथ तयार करण्याकरिता किती कसोट्या मधुन जावे लागते. हे आपण वरील लेखामध्ये

पाहिलेच आहे. कारण ह्यासर्व कसोट्या मधुन गेल्यानंतर पुस्तकरुपी अपत्य जन्माला येत असते. म्हणुन प्रकाशन व्यवसायामध्ये सर्वच घटक महत्वाचे असले तरी यामध्ये पुस्तक प्रकाशकांना अन्यनसाधारण महत्व आहे. कारण पुस्तकाचे मानवी जीवनामध्ये काय व किती महत्व आहे हे सर्वांनाच माहीत आहे. पुस्तक हे प्राचीन काळापासुन चालत आलेली दिर्घ परंपरा आहे. हस्तलिखीत स्वरुपात विविध विषयावर विविध प्रकारामध्ये ग्रंथलेखन छपाई कलेमुळे, सुबक, नेटके व देखणे रुप देऊन आणि त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन ते आकर्षक, छायाचित्र, चमकदार कागदाने, शोभिवंत बनवुन कलात्मकतेने सजवुन नव तंत्रज्ञानाची जोड देऊन आज वाचकांपर्यंत पोहचविणे हे सर्व कार्य प्रकाशक उत्तम रितीने आजसुध्दा करीत आहे. पुस्तक लेखकांनी लिहील्यापासुन ते वाचकांच्या हातात पडेपर्यंतचा हा प्रकाशकांचा प्रवास मात्र अनेकांना माहीत नाही. "दुध कोन देतं?" असा प्रश्न शहरी मुलांनी उत्तर दिले कि गवळी असे उत्तर मिळाले अशी अवस्था आहे.

म्हणुन लेखकाने केलेल्या पुस्तक लेखनापेक्षा त्याला पुस्तक रुप देऊन वाचकापर्यंत पोहचविणारी व्यवस्था म्हणजेच प्रकाशक होय म्हणुन पुस्तक प्रकाशनामध्ये प्रकाशकांना अन्यनसाधारण महत्व आहे.

तसेच अनेकांच्या सहभागाने ग्रंथ निर्मितीचे कार्य संपन्न करणारी प्रक्रिया ही एक सांघीक प्रक्रिया आहे. म्हणुन पुस्तक लिहिण्यापासुन ते वाचकांच्या हातात पडेपर्यंतच्या प्रवासामध्ये सहभागी असणारे सर्व घटक जसे, प्रकाशक, लेखक, संपादक, डिझायनर, डीटीपी ऑपरेटर, मुद्रीतशोधक, आर्टीस्ट, चित्रकार, बांधणीकार मार्केटिंग व्यवस्थापक, विक्रेते या सर्वांनी मिळुन संघटीत कार्य केल्यानंतर प्रकाशक एक पुस्तकरुपी अपत्य जन्माला घालते असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. परंतु पुस्तकरुपी अपत्य जन्माला घालतांना ज्या वेदना सहन कराव्या लागतात. त्यापेक्षा मात्र जेव्हा नवीन कोरे पुस्तक छापून येते तेव्हा त्याची अनुभुतीचा आनंद प्रकाशकाला जास्त होत असते. परंतु प्रकाशक आपल्या वेदनाविषयी फारसे बोलतांना दिसत नाही. पुस्तक प्रकाशन प्रक्रियेमध्ये वरील सर्व घटकांच्े सहकार्य, समन्वय व सुसंवादातून प्रकाशन व्यवसाय चालत असते. प्रकाशन व्यवसायामध्ये प्रकाशकांचा उद्देश हा कलेची आवड, ज्ञानाची जोपासणा करणे, आणि ते ज्ञान समाजापर्यंत पोहचविणे, समाज सुस्कृंत बनविणे. त्यामधुन चांगला ज्ञानी समाज निर्माण करणे, असे देशहिताकरिता आणि समाज घडविण्याकरिता अंत्यत महत्वपुर्ण कार्य प्रकाशक आपल्या प्रकाशन व्यवसायाद्वारे करीत असते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :**


- भोर, उज्जवला.(2021). प्रकाशन, संपादन आणि लेखन कौशल्य, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, पे.नं. 1-98
- भटकळ, रामदास.(2015).पाप्युलररीती पुस्तक, पाप्युलर प्रकाशन, पुणे
- गोगटे, शरद. (1999). प्रकाशन व्यवसाय परिचय, पुणे अखिल भारतीय मराठी प्रकाशन संघ.
- गोगटे, शरद.(2001). मराठी ग्रंथ प्रकाशन व्यवसाय परिचय, पुणे अखिल भारतीय मराठी प्रकाशन संघ.
- वैद्य मोहन. (2020-2021). प्रकाशन विश्व, पुणे : राजहंस प्रकाशन
- महाराष्ट्र टाईम्स. (8 एप्रिल 2019), ग्रंथ निर्मिती, सोहळा
- संपा. कुबेर, गिरीश. (जानेवारी 2020) दैनिक लोकसत्ता, लोकरंग रवी.